**नियमीत दिवाणी दावा क्र.३५५/२०२४**
**CNRNOMHOS120005322024**
**जयसिंग वि. रामलिंग**
**नि.क्र. ३० खालील आदेश**
**(आदेश दि.१३/०८/२०२५)**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्यबातल होवुन कैफियत दाखल करुन घेणेसाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे, प्रस्तुत पक्षकारांमध्ये प्रकरण तडजोडीने मिटविण्याची बोलणी चालु असल्यामुळे त्यांना वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. सबब, प्रसतुत अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल केले आहे की, प्रतिवादींनी केलेला सदरचा अर्ज योग्य नाही. सबब, सदरहू अर्ज नामंजुर करणेची विनंती केली आहे. त्याने पर्यायी अशी ही विनंती केली आहे की अर्ज मंजुर करावयाचा असल्यास प्रतिवादीवर रक्कम रुपये १०,०००/- खर्च लादण्यात यावा.

३. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन करता प्रस्तुत प्रतिवादीं विरुध्द दिनांक ०६.१२.२०२४ रोजी विना कैफियत आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी त्याच्या अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ प्रतिवादी क्रं. १ चे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जात नमूद केलेले कारण जरी संयुक्तीक नसले तरी दाव्याचा गुणदोषावर निकाल करण्याच्या हेतूने प्रस्तुतचा अर्ज कॉस्टवर मंजुर करणे न्यायोचित ठरते. सबब, खालील आदेश.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी प्रत्येकी रक्कम रुपये २००/- इतकी कॉस्ट वादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात

येतो.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत प्रतिवादींनी सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2025.08.13 16:12:19 +0530

दिनांक – १३.०८.२०२५

( राहुल द. डांगे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District - Osmanabad. |
| Date | --- | 13/08/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 13/08/2025 |
| Order uploaded on | --- | 13/08/2025 |